संशोधन आराखडा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन (सन 2012 ते 2022)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्या शाखेअंतर्गत पी.एच.डी. पदवीसाठी अर्थशास्त्र विषयात सादर करायचा संशोधन आराखडा

-: संशोधक :-

संगीता लछमन्ना मैंदपवाड

अर्थशास्त्र (एम.ए.)

-: मार्गदर्शक :-

डॉ. राजेश्वर विश्वनाथ कीर्तनकार

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नारायणराव वाघमारे, महाविद्यालय, आखाडा बाळापूर

ता.कळमनुरी जि.हिंगोली

2022

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन.
(सन 2012 ते 2022)

प्रस्तावना :-

स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्व भारतामध्ये प्राचीन काळापासून पहावयास मिळते. स्थानिक पातळीवरील सार्वजनिक स्वरुपाची विशेषतः लोक कल्याणकारी कामे करणाऱ्या संस्थांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणतात. स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुरावे आपल्याला वेद, पुराणे, उपनिषदे, धर्म-ग्रंथ, स्मृती , कथा, शास्त्र, वर्णनात्मक ग्रंथात आढळून येतात.

व्हाईसरॉय लॉर्ड रिपन भारतात गव्हर्नर जनरल असतांना त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था बाबतीत जनतेच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी अनेक निर्णय घेऊन त्यात अमुलाग्र बदल घडवून आणले. व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी इसवी सन 1882 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित स्वरुपात स्वातंत्र्य दिले व जिल्हा लोकल बोर्ड सुरू करून गावांपर्यंत स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रस्तुत केली होती.

इसवी सन 1919 नंतर भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास टप्प्या टप्प्याने घडवून आणण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार सर्व प्रांतामध्ये ग्राम पंचायत, जिल्हा बोर्ड व नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून स्थापना झाल्या आहेत.

राज्यात लोकशाही प्रणाली सुदृढ, सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वातंत्र्य देण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या नेमल्या गेल्या होत्या, त्यामध्ये अशोक मेहता समिती, पी. बी. पाटील समिती, श्री. जी. व्ही. के राव समिती, डॉ. एल. एम. सिंघवी समिती, या समित्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करण्यासाठी

नेमण्यात आल्या होत्या. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा इसवी सन 1993 या वर्षी 73 वी, 74 वी घटना दुरूस्ती करून प्राप्त झाला.

स्थानिक स्वराज्य संस्था पुढील प्रमाणे सांगता येतील.

ग्रामीण	**शहरी**
जिल्हा परिषद	महानगरपालिका
पंचायत समिती	नगर परिषद
ग्राम पंचायत	कटक महामंडळ
नगर क्षेत्र समिती	

तक्ता क्र.1.

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांचा समावेश होतो. शहरातील लोकसंख्येच्या आधारे महानगरपालिकेची निर्मिती होत असते. केंद्रशासित प्रदेशात महानगरपालिका निर्मितीचे अधिकार संसदेला असतात, तर राज्यात महानगरपालिका निर्मितीचा अधिकार हा राज्य सरकारला असतो. स्थानिक स्वराज्य संस्था कोणत्या ठिकाणी स्थापना करावी लागणार व त्यांच्यातील फेरबदल करण्याचा अधिकार देखील राज्य सरकारलाच असतो. शहरातील लोकसंख्येच्या आधारे महानगरपालिकांची श्रेणीत विभागणी केली जाते.

खालील चार गटात महानगरपालिकांची विभागणी केली जाते.

1. एक कोटी लोकसंख्येची शहरे अ + (A +) श्रेणीत.
2. एक कोटी पेक्षा कमी / जास्त लोकसंख्या असणारी शहरे अ ते ड (A to D) श्रेणी पर्यंत.

शहरांचे प्रशासन पाहण्याचे काम महानगरपालिका करत असते. शहरांमध्ये नगरपालिका स्थापना करणे, नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर करणे, या बाबतीत राज्य सरकार सर्व निर्णय घेते, त्यासंबंधी अधिकृत अधिकार राज्य शासनास आहेत. महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका बृहन्मुंबई येथे इसवी सन 1888 मध्ये स्थापन झाली. स्वातंत्र्योत्तर काळात इसवी सन 1947 मध्ये केवळ मद्रास, कलकत्ता आणि मुंबई या शहरांमध्येच महानगरपालिका होत्या.

महाराष्ट्रातील महानगरपालिकांची माहिती :-

क्रमांक	महानगरपालिका	स्थापना	श्रेणी	लोकसंख्या
1	बृहन्मुंबई महानगरपालिका	1888	अ+	1,19,14,398
2	पुणे महानगरपालिका	1950	अ	31,15,431
3	नागपूर महानगरपालिका	1951	अ	24,05,421
4	ठाणे महानगरपालिका	1982	ब	18,18,872
5	पिंपरी चिंचवड महानगरपालिका	1982	ब	17,29,359
6	नाशिक महानगरपालिका	1982	ब	14,86,973
7	कल्याण डोंबिवली महानगरपालिका	1982	क	12,46,381
8	वसई-विरार शहर महानगरपालिका	2009	क	12,21,233
9	छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका	1982	क	11,71,330
10	नवी मुंबई महानगरपालिका	1992	क	11,19,477
11	सोलापूर महानगरपालिका	1964	ड	9,51,558

12	मीरा-भाईंदर महानगरपालिका	2002	ड	8,14,655
13	भिवंडी निजामपूर महानगरपालिका	2002	ड	7,11,329
14	अमरावती महानगरपालिका	1983	ड	6,46,801
15	नांदेड वाघाळा महानगरपालिका	1997	ड	5,50,564
16	कोल्हापूर महानगरपालिका	1972	ड	5,49,283
17	अकोला महानगरपालिका	2001	ड	5,37,489
18	उल्हास नगर महानगरपालिका	1998	ड	5,06,937
19	सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका	1998	ड	5,02,697
20	मालेगाव महानगरपालिका	2003	ड	4,71,006
21	जळगाव महानगरपालिका	2003	ड	4,60,468
22	लातूर महानगरपालिका	2011	ड	3,82,754
23	धुळे महानगरपालिका	2003	ड	3,76,093
24	अहमदनगर महानगरपालिका	2003	ड	3,50,905
25	चंद्रपूर महानगरपालिका	2011	ड	3,21,036
26	परभणी महानगरपालिका	2011	ड	3,07,191
27	पनवेल महानगरपालिका	2016	ड	3,75,463
28	इचलकरंजी महानगरपालिका	2022	ड	2,87,570

29	जालना महानगरपालिका	2023	ड	19,58,483

तक्ता क्र.2. स्रोत- इंटरनेट (विकिपीडिया).

राज्यानुसार महानगरपालिकांना संबोधली जाणारी नावे :-

राज्य	**राज्यानुसार महानगरपालिकेचे नाव**
दिल्ली, उत्तर प्रदेश, उत्तरा खंड ,बिहार, झारखंड, राजस्थान, हरयाणा	नगर निगम
पंजाब	नगर निगम
गोवा महाराष्ट्र	महानगरपालिका
कर्नाटक	महानगरपालिका
गुजरात	महानगर सेवासदन
आसाम	पौरोनिगम
ओरिसा	पौरो निगम/ पौरो परिषद
पश्चिम बंगाल	पौरोनिगम
त्रिपुरा	पूर पोरीशोद
छत्तिसगड, मध्य प्रदेश	नगरपालिका निगम
तेलंगणा, आंध्र प्रदेश	महानगरपालिका,नगरपालिका
केरळ	नगर सभा, नगरपालिका

तामिळनाडू	महानगर, नगर निगम

तक्ता क्र.3.

महानगरपालिकेची रचना :-



वरील प्रमाणे महानगरपालिकेतील रचना असते. शहरातील समस्या आणि विकास कामांसाठी महानगरपालिका महत्त्वाची स्थानिक पातळीवरील संस्था आहे.

स्थानिक प्रशासन हे राज्य सरकार कडून मालमत्ता कर व अनुदान गोळा करून समाजासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा पुरवण्यासाठी कामे करते आणि दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरी क्षेत्राचे व्यवस्थापन करते.

महानगरपालिकेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागाची जी संख्या ठरते, ती त्या शहराच्या लोकसंख्यांवरून ठरते व काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिलांसाठी असतात.

महानगरपालिका प्रशासन :-

महानगरपालिकेचा सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी हा महानगरपालिकेचा आयुक्त असतो. महानगरपालिका आयुक्त पदाची नियुक्ती राज्य शासन करते. भारतात महानगरपालिका आयुक्त हे पद इसवी सन 1865 वर्षी निर्माण करण्यात आले होते हे पद ब्रिटिश कालावधीपासून आजही अस्तित्वात आहे.

महानगरपालिका आयुक्त यांचे अधिकार व कार्य :-

- ठराव मांडणे, आदेश निर्णयाची अंमल बजावणी करणे.
- विकास कामावर नियंत्रण ठेवणे.
- कर्मचाऱ्यांचे वेतन, रजा ,भत्ता, निवृत्ति वेतन इत्यादी संबंधित कार्य करणे.
- अर्थसंकल्प स्थायी समितीला देणे.
- वर्ग तीन व वर्ग चार कर्मचाऱ्यांचे भरती करून घेणे.
- महानगरपालिकेतील कर गोळा करणे.
- महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अतिक्रमण हटवणे.

महानगरपालिकेचा प्रशासकीय कारभार हा आयुक्तांच्या हाती असतो. महानगरपालिकेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. सदस्यांचा कार्यकाळ हा

पाच वर्षाचा असतो. महानगरपालिकेत निवडून आलेल्या सदस्यास नगर सेवक म्हणतात. इसवी सन 1888 च्या सुधारित महानगरपालिका अधिनियमानुसार महापौर यांच्या कडून उप-महापौर नियुक्त केला जातो. महापौर आणि उप-महापौर यांचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो. महापौर हे नगर सेवकाच्या मदतीने महानगरपालिकेचे नियोजन आणि विकास संबंधित कामावर अंमल बजावणी करतात.

महानगरपालिकांचे कार्ये :-

- शहराचे नियोजन करणे.
- आर्थिक सामाजिक विकास करणे.
- सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविणे.
- शहरातील स्वच्छता राखणे.
- घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे.
- अग्निशामक सेवा पुरवणे.
- पर्यावरणाचे संरक्षण करणे.
- पाणी पुरवठा करणे.
- घर बांधकामाचे नियम आखणे.
- गरिबी निर्मूलन करणे.
- जन्म मृत्यू नोंदणी ठेवणे.
- सार्वजनिक सुविधा पुरविणे.
- उद्याने नागरी सुविधा पुरविणे.
- समाजातील शारीरिक दृष्ट्या दुर्बल घटकास मदत करणे.

पिंपरी चिंचवड शहरांची माहिती :-

- इसवी सन 2011 च्या जनगणने प्रमाणे लोकसंख्या - 17,29,359 एवढी होती.
- सद्य स्थितीत लोकसंख्या - 20,00,000 एवढी आहे.

- साक्षरतेचे प्रमाण इसवी सन 2011 प्रमाणे 90.90% एवढे होते.

पिंपरी चिंचवड हे शहर भारत देशातील आशिया खंडात येणारे शहर आहे. पिंपरी चिंचवड हे शहर महाराष्ट्र राज्यात असणारे, मुंबई या राज्याच्या राजधानी पासून 150 किलोमीटर अंतरावर आहे. हे शहर पवना नदी तीरावर वसलेले आहे. पिंपरी चिंचवड शहराचे क्षेत्रफळ 181 चौरस किलोमीटर एवढे आहे. ते समुद्र सपाटी पासून 530 मी. उंचीवर आहे. क्रांतिकारक चाफेकर यांची जन्मभूमि असणारे पिंपरी चिंचवड शहर औद्योगिक महानगरी म्हणून पण ओळखले जाते. पिंपरी चिंचवड शहरास धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहेच. पण आयटी, ऑटोमोटिव्ह उत्पादन क्षेत्रात अधिक विकसित दिसून येणारे शहर आहे.

पिंपरी चिंचवड या शहराला धार्मिक, व्यावसायिक व ऐतिहासिक महत्त्व लाभल्या मुळे या शहरात नागरिकांची वास्तव्यता वाढत गेली आहे. या शहरात लोकसंख्या वाढल्यामुळे नागरिकांना स्वच्छता, आरोग्य, पाणी पुरवठा, वाहतूक, पर्यावरण इत्यादी संबंधी मोठ्या प्रमाणात समस्या भेडसावत असल्याचे आढळून येत असत.

या विविध समस्या किंवा हे स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी राज्य शासनाने 11 ऑक्टोबर 1982 ला पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेची स्थापना केली आहे. या शहरातील प्रामुख्याने समाज उपयोगी निर्णय, योजना, आरोग्य, स्वच्छता, पाणी पुरवठा अशा विविध स्थानिक समस्या सोडवण्याचे कार्य महानगरपालिका करते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्य क्षेत्रातील माहिती :-

1) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी - 7697.
2) वार्षिक अर्थसंकल्प सन 2022-23 - 5600 कोटी.
3) अंतर्गत व मुख्य रस्त्याची लांबी - 633 किलोमीटर.
4) शहरातील कारखाने - 2969.
5) झोपडपट्टीतील लोकसंख्या - 147810.
6) पालिकेच्या रुग्णालयांची संख्या - 8.
7) शहरातील सार्वजनिक उद्याने - 142.

8) महापालिकेची संख्या-136 + खाजगी शाळा - 208.

9) मल शुद्धिकरणं प्रकल्प क्षमता - 417 एम. एल. डी.

पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेत 32 प्रभाग आहेत. आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात चार प्रभाग येतात. सध्य स्थितीत श्रमिक वर्गाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसून येते. उत्पादन पातळी वाढविण्यासाठी श्रमिक कामगारांचा महत्त्वाचा वाटा असतो. मग तो कामगार कृषी मधील असो, नोकरदार असो, बांधकाम विभागातील असो, का मग ते सफाई कामगार असो, त्यांच्या मूलभूत प्रश्नाकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे असते.

यामधीलच एक सफाई कामगार हा शहरातील अस्वच्छता, नाली, गटार साफ करण्यात आपले आयुष्य घालवतात. त्यांच्या आर्थिक अडचणी, सामाजिक समस्या ज्या त्यांना उद्भवतात त्या समस्यांकडे शासनाचे नेहमीच दुर्लक्ष झालेले आढळून येते. कोरोना सारख्या महाभयंकर महामारीत सफाई कामगार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पूर्ण करताना दिसून आले. आजही शहराची स्वच्छता आणि सुंदरता राहण्यास सफाई कामगारांचा मोलाचा वाटा असल्याचे आढळून येते.

समस्या सूत्रंण :-

पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेतील सफाई कामगार हा चतुर्थ श्रेणी वर्गात येतो. या सफाई कामगारामधील महिला सफाई कामगारांना कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात समस्या उद्भवतात. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजा सुद्धा पूर्ण करणे कधी कधी अवघड होते. सफाई कामगार म्हणून महिला वर्ग काम करतांना त्यांच्या कौटुंबिक समस्या देखील त्यांना निर्माण होतात.

महिला सफाई कामगारांना अल्प वेतनामुळे कौटुंबिक स्थितीत येणाऱ्या अडचणी, कामात येणाऱ्या समस्या, सामाजिक समस्या इत्यादी चा विविध बाबींवर परिणाम होतो, आर्थिक स्थिती मध्ये सुधारणा न झाल्याने कौटुंबिक जीवनावर, मुलांच्या शैक्षणिक स्थितीवर, आरोग्यावर विविध परिणाम आपल्याला आढळून येतात. महिला सफाई कामगारांच्या अशा विविध अनेक समस्यांचा व परिणामांचा

अभ्यास करण्यासाठी पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे सखोल अध्ययन करण्यासाठी संशोधनाचा हा विषय निवड करण्यात आला.

अध्ययन विषयाची निवड :-

प्रत्यक्ष श्रमदान करणारा सफाई कामगार हा एक महत्त्वाचा घटक असून. तो असंघटित लोक शक्तीचा एक भाग आहे. सफाई कामगारांची आर्थिक, सामाजिक व रहाणीमानाची स्थिती सुधारणे अपेक्षित आहे. त्यांच्या अल्प वेतनामुळे त्यांच्या रहाणीमानाचा जीवनमानाचा स्तर उंचावलेला दिसून येत नाही.

तसेच महिला सफाई कामगारांना कौटुंबिक येणाऱ्या समस्या त्यांच्या व्यावसायिक समस्यांशी संबंधित आहेत का? त्यांच्या कामाचा त्यांच्या कौटुंबिक सदस्यावर परिणाम होतो का? त्यांची सामाजिक स्थिती कशा प्रकारची आहे? त्यात काही सुधारणा झाली आहे का? आर्थिक स्थितीत काही बदल झाला आहे का? अल्प वेतना मुळे त्यांच्या पाल्यावर शैक्षणिक समस्या उद्‌भवतात का? व त्यांच्या रहाणीमानात काही बदल झाला आहे का? या महिला सफाई कामगार वर्गात दारिद्र्याचे प्रमाण आहे का?

सरकारकडून काही मदत मिळाली आहे का? या सर्व गोष्टींचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. या सफाई महिला कामगारांना न्याय मिळून देता यावा व त्यांचे प्रश्न क्रमाचा लक्षात घेऊन त्यावर काही उपाय शोधून महत्त्वपूर्ण व उपयोगी शिफारसी शासनास मांडता याव्यात या हेतूने हा विषय संशोधन विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधन आराखडा :-

संशोधन आराखडा हे संशोधनाची दिशा ठरवते तसेच संशोधनात घेतलेले उद्‌दिष्टे प्राप्तीसाठी मार्गदर्शक ठरत असतात. संशोधनात येणाऱ्या समस्यांचा विचारपूर्वक अंदाज घेऊन संशोधनाची रूपरेषा संशोधन आराखड्याच्या माध्यमातून निश्चित होत असते. म्हणून प्रस्तुत संशोधन आराखड्यात पिंपरी चिंचवड या

महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. आणि प्रस्तुत संशोधन आराखडा हा मिळालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

अध्ययन विषयाचे महत्त्व :-

स्वत:च्या जीवाची परवा न करता करोना सारख्या महामारीत सुद्धा सफाई कर्मचारी कोणतीही भीती न बाळगता शहरांची सफाई कामे करत होते. स्वत:च्या जीवाची तमा न बाळगता आपल्या परिवाराचा न विचार करता ते आपले सफाई काम करत होते. इतके काम करून सुद्धा सरकारकडून या वर्गाला हवी तेवढी मदत मिळत नाही. या वर्गाने आंदोलने केले तरी प्रशासन दुर्लक्ष करतांना आढळते.

त्यामुळे समाजात जो दर्जा मिळायला हवा तो सफाई कामगारांना मिळत नसल्याचे दिसून येते. अल्प वेतन, कामाच्या ठिकाणी असुविधा, कामाचे स्वरूप कायमस्वरूपी नसणे, वरिष्ठांकडून पिवळणूक होणे आदि समस्या आढळून येतात. आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने महिला सफाई कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक स्थितीवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतांना दिसून येतो.

महिला सफाई कामगारांना वरील सर्व समस्या तर येतातच त्याच बरोबर महिला सफाई कामगारांची आरोग्या संबंधी प्रश्नाकडे सुद्धा दुर्लक्ष केले जाते. त्यांच्या वेतनाच्या बाबतीत त्यांच्यावर अन्याय होतो तसेच वरिष्ठांकडून पण महिला सफाई कामगारांची पिळवणूक होत असल्याचे आढळून येते. या विविध बाबींचा अभ्यास सखोल पद्धतीने झाल्याचा दिसून येत नाही. त्यासाठी पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेतील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर अध्ययन करणे महत्त्वाचे वाटते.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

कोणत्याही समस्येच्या सखोल आकलनासाठी संशोधनातील काही उद्दिष्टे ठरवावी लागतात. त्यामुळे सदर विषयासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत**.**

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पार्श्वभूमी व रचना अभ्यासणे.

2. पिंपरी चिंचवड या महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या महिला सफाई कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
4. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगार व शासकीय कल्याणकारी उपाय योजना यांचा अभ्यास करणे.
5. उपरोक्त विषयासंबंधी शिफारसी सुचविणे.

संशोधनाची गृहीत कृत्ये :-

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांची आर्थिक स्थिती समाधान कारक नाही.
2. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांच्या सामाजिक स्थितीत खूप समस्या आहेत.
3. पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वेतना संबंधित, कुटुंबा संबंधित, सामाजिक वागणुकीत मिळणाऱ्या दर्जे संबंधित, अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी निवडला आहे. या संशोधना संबंधित माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम आधार सामग्री चा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनात नमुना निवड करतांना संभाव्यता नमुना निवड संशोधन पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील एकूण महिला सफाई कामगारां पैकी दहा टक्के सफाई महिला कामगारांची निवड करण्यात येणार आहे. प्रश्नावली, मुलाखत आणि प्रत्यक्ष निरीक्षण तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनाच्या दोन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक तथ्य संकलन.
2) दुय्यम तथ्य संकलन.

1) **प्राथमिक तथ्य संकलन :-** प्रस्तुत शोध प्रबंधात प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, प्रत्यक्ष निरीक्षण, या तंत्राचा अवलंब करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांची कौटुंबिक स्थिती, सामाजिक परिस्थिती, त्यांचे रहाणीमान, आर्थिक स्थिती, इत्यादी विषयी प्राथमिक माहिती संकलित केली जाणार आहे.
2) **दुय्यम तथ्य संकलन :-** प्रस्तुत शोधप्रबंधात द्वितीय आधार सामग्री संकलित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शासकिय दस्तऐवज, महानगरपालिकेतील कामगारांचे वेतन विषयी नोंदी, विविध वृत्तपत्रातील लेख, मासिकांमधील माहिती, नियतकालिके, साप्ताहिक, अर्थशास्त्रीय ग्रंथ, संशोधन संबंधित ग्रंथ, इंटरनेट वरील माहिती, वेबसाईट, इत्यादीं च्या मार्फत दुय्यम तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

नमुना निवड :-

प्रस्तुत शोधप्रबंधात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील दहा टक्के महिला सफाई कामगारांची प्रश्नावली, मुलाखत, आणि प्रत्यक्ष निरीक्षण, द्वारे तथ्य गोळा केली जाणार आहेत यासाठी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने माहिती संकलित करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगार या पुरतेच मर्यादित असणार आहे. संशोधनाची मर्यादा पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेतील एकूण महिला सफाई कामगारांपैकी दहा टक्के महिला सफाई कामगार नमुना निवड म्हणून घेण्यात येणार आहेत.

संशोधनाचा कालखंड :-

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड हा इ.स. 2012 ते 2022 असा निश्चित करण्यात आला आहे.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रस्तुत संशोधन विषय खालील प्रमाणे प्रकरणाची मांडणी करून प्रस्तुत करण्यात आलेला आहे.

1. प्रकरण पहिले - प्रस्तावना.
   प्रस्तुत पहिल्या प्रकरणात विषयाच्या अनुषंगाने माहिती प्रस्तावनाच्या माध्यमातून विषय प्रवेश.
2. प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा.
   या प्रकरणात पूर्वी संशोधन झालेल्या साहित्याचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे संशोधन विषयास व्याप्ती दिशा निश्चित होईल.
3. प्रकरण तिसरे - पिंपरी चिंचवड शहर व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ओळख.
   या प्रकरणात पिंपरी चिंचवड शहराचे औद्योगिक, ऐतिहासिक, धार्मिक, औद्योगिक महत्त्व, पिंपरी चिंचवड शहराचे इतिहास अभ्यासने, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची रचना अभ्यासने या संबंधित सर्व माहिती या प्रकरणात अभ्यास ली जाणार आहे.
4. प्रकरण चौथे - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांची आर्थिक स्थिती अभ्यासणे, रहाणीमान, वेतन विषयी माहिती, निवास स्थिती, दारिद्र्य, कर्जाची स्थिती, शेत जमिनीची स्थिती, इत्यादी विषयी गोष्टींवर या प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे.

5. प्रकरण पाचवे - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांची सामाजिक स्थिती अभ्यासणे. या प्रकरणात कौटुंबिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, वैवाहिक स्थिती आणि शासकीय कल्याणकारी योजनांचा अभ्यास इत्यादी बाबींवर या प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे.
6. प्रकरण सहावे - उपरोक्त विषयासंबंधी निष्कर्ष व शिफारसी सुचवणे.
   या प्रकरणात तथ्य संकलन द्वारे महिला सफाई कामगाराची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक संबंधित माहिती त्यांच्या प्रश्नावली द्वारे मिळालेले सर्व माहितीवरून निष्कर्ष काढले जाणार आहेत. सफाई कामगारांना न्याय मिळून देण्यासाठी त्यांच्या प्रश्नांचे व समस्या वर उपाय काय करता येईल त्यावर शासनास शिफारसी करण्यात येणार आहे.

❖ संदर्भ सूची.
❖ परिशिष्टे.

संदर्भ साहित्य :-

1) आगलावे डॉ. प्रदीप, 2020, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन नागपूर.
2) यमलवाड गोविंद, 1999, “स्थानिक स्वराज्य संस्था”, कल्पना प्रकाशन शिवाजीनगर, नांदेड.
3) बंग के. आर. (2005), “भारतातील स्थानिक स्वशासन” विशेष संदर्भ - महाराष्ट्र राज्य श्री मंगेश प्रकाशन, श्री. शांता दुर्गा निवास 23, नवी रामदास पेठ, नागपूर.
4) शाम शिरसाठ व बैनाडे भगवानसिंग (2006), “भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था”, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
5) भागानगरे शिवाजी दौलतराव (2011). “नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन” (सन 1998 ते 2008). प्रकाशित पीएच.डी प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

6) भिंताडे वि. रा (2007), “शैक्षणिक संशोधन पद्धती”, नुतन प्रकाशन, पुणे.
7) माहेश्वरी एस. आर. (2004), “भारत में स्थानिक शासन”, लक्ष्मीनारायण अग्रवाल, आग्रा.
8) लोटे रा. ज. (1999), “भारतातील सामाजिक समस्या”, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर.
9) दर्शनकार अर्जुन, (जून 1997) “पंचायत राज व नागरी प्रशासन”, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद.
10) पुणे महानगरपालिका वेबसाईट - http://www.pcmcindia.gov.in/marathi.

संशोधक
संगीता लछमन्ना मैदपवाड
अर्थशास्त्र (एम.ए)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. आर. व्ही. कीर्तनकार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर
ता. कळमनुरी जि. हिंगोली.